गोल्डा मियरचा पहिला संघर्ष

केल्सी रिले, मराठी: अश्विनी बर्वे



गोल्डा मियरचा पहिला संघर्ष

केल्सी रिले, मराठी: अश्विनी बर्वे





“सगळ्या लोकांनी शांत रहावे, आता मिटिंग सुरु होणार आहे.” मी आपल्या दोन खोल्यांच्या वॉलनट स्ट्रीट अपार्टमेंट मध्ये मुलींच्या समोर घोषणा केली.





ती अमेरिकन यंग सिस्टर्स सोसायटीची पहिली बैठक होती. ती सोसायटी रुसच्या यहुदी थी. वो सोसाइटी रूसच्या स्थलांतरित यहूदीचा एक समूह होता. मी गोल्डी माबोहेज़ने स्वाभाविकपणे स्वतःला त्या सोसायटीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले होते.



त्या खोलीत माझी छोटी बहीण क्लारा, माझी सगळ्यात चांगली मैत्रीण रेजिना, माझी शेजारीण बेले आणि तिची बहीण फ्रीडा होती. माझे सहपाठी लिलियन आणि काही इतर लोकपण होते.

मी पाठ्यपुस्तकांवर चर्चा करण्यासाठी ही मीटिंग बोलावली होती.

“आमच्या शाळेच्या मुलांकडे पाठ्यपुस्तकें खरेदी करण्यासाठी पैसे नाहीत,” मी म्हटलं. “त्यांना आपल्या मदतीची गरज आहे.”





“तुमच्यापैकी कोणी हाइमीचे पुस्तक बघितले आहे का?” रेजिनाने विचारलं. “तो आपल्या कुटुंबातला ते पुस्तक वापरणारा तिसरी व्यक्ती आहे. त्याच्या पुस्तकाची अधिकतर पानं गायब आहेत.”

"जेनी वाचण्यासाठी माझ्या पुस्तकात डोकावते," फ्रीडा म्हणाली. “जर तिच्याकडे स्वतःचं पुस्तक असतं तर.”

"आपल्याला पुस्तकांसाठी किती पैसे गोळा करावे लागतील?" बेलेने विचारले.

"त्यासाठी आपल्याला प्रत्येकाला एका आठवड्यासाठी तीन सेंट द्यावे लागतील," मी म्हटलं. कारण आमच्यात चवथीच्या संपूर्ण वर्गात गणितात सगळ्यात हुशार होते, म्हणून सरळ होते की मलाच हिशोब करून सांगायचं होतं.

लिलियन जोरात ओरडली. "गोल्डी, हे खूप जास्त आहे. बघ, तीन सेंट मध्ये एक मोठा पाव येतो.".

"तीन सेंट मध्ये एक लीटर दूध येते," सारा म्हणाली.

रेजिना म्हणाली, "जर गोल्डी ला वाटते की हे शक्य आहे तर आपण ते करू शकू."

पण जेव्हा बैठक संपली, तेव्हा मी विचार केला की क्लारा आणि मला प्रत्येक आठवड्याला सहा सेंट कुठून मिळतील?

मग माझ्या लक्षात आलं की मला काय करावं लागेल ते.



रोज सकाळी शाळेच्या आधी मी आईच्या किराणा दुकानात काम करत असे, कारण त्या वेळी आई घाऊक बाजारात खरेदी करण्यासाठी जात असे.

दुसऱ्या दिवशी, जेव्हा मिसेज़ प्लॉटकिन एक लीटर दूध घेण्यासाठी दुकानात आल्या, तेव्हा मी त्यांना म्हणाले, “मी आणि माझ्या मैत्रीणी, जी मुलं शाळेची पुस्तकं घेऊ शकत नाही त्यांच्यासाठी पैसे गोळा करत आहोत. म्हणून कृपया आज तुम्ही एक लिटर दुधासाठी पाच सेंट द्या.”



“पण तुझी आई तर त्यासाठी केवळ तीनच सेंट घेते. त्यांनी विरोध करत म्हटलं. पण त्यांनी आपल्या पर्स मध्ये हात घालून आणि पाच सेंटचे नाणं माझ्या हातावर ठेवलं. "गोल्डी, तू खरंच मोठी जिद्दी आहे,” त्यांनी माझे गाल कुरवाळत म्हटलं.

“पावासाठी पाच सेंट,“ मी मिस्टर मार्गोलिसला म्हणाले.

"गरीब मुलांना पुस्तकांची गरज आहे.” मग त्यांनी चामड्याचे पाकीट आपल्या खिशातून काढले.पण त्यांच्या जवळ केवळ चार सेंट होते. आणि मी ते घेऊ शकत नव्हती.

मी मिसेज़ गारफिंकेलसाठी सहा अंडी मोजली. "दहा सेंट," मी त्यांना म्हणाले. “मी त्या मुलांसाठी शाळेची पुस्तके गोळा करण्याचा प्रयत्न करत आहे, जे गरिबीमुळे पुस्तकं विकत घेऊ शकत नाही.






“हे बघ! तुझी आई एका अंड्यासाठी केवळ एक सेंटच घेते. मी तुला तेवढेच पैसे देईन!” ते रागात म्हणाले.मग त्यांनी आपली अंडी उचलली आणि दरवाज्यातून बाहेर गेले..

पण माझे सगळे प्रयत्न करूनही, आठवड्याच्या शेवटपर्यंत क्लारा आणि मी अजूनही आमच्या हिश्श्याचे पैसे गोळा करू शकलो नव्हतो. त्या गटाच्या अध्यक्षाच्या रुपात, मी माझे पर्याय शोधले. मी मुलांना गणित शिकवायला मदत करू शकते.पण कोणत्याही मुलाकडे शिकवणीचे पैसे द्यायला पैसे नव्हते. मी एखाद्या दुकानात जूनियर सेल्स-गर्ल म्हणून काम करू शकते, पण आईला शाळेत जाण्यापूर्वी माझी गरज असते. शाळेनंतर क्लाराला माझी गरज असते. मग माझ्या लक्षात आले की मला काय करायचं आहे. आम्ही ठरवलं की आम्ही आमची एखादी प्रिय वस्तूचा त्याग करायला हवा.





जेव्हा आईने आम्हांला गोड गोळी खाण्यासाठी एक-एक सेंट दिले, तेव्हा मी क्लाराला म्हटलं की आपण गोळ्या खायच्या नाहीत.

“गोड गोळी खायची नाही?” क्लाराने आपलं नाक उडवलं.

मी हो म्हणत मान हलवली. “तू जे चांगलं काम करणार आहे त्याबद्दल विचार कर!” पण पुढच्या बैठकीपर्यंत कोणीही पुरेसे पैसे जमा करू शकले नव्हते.

“आपल्याला काहीतरी मोठा विचार करण्याची गरज आहे,” मी म्हटलं. “आपण पैसे गोळा करण्यासाठी एक सार्वजनिक बैठक आयोजित करूया, आणि मग त्या दिवशी सगळ्यांकडून वर्गणी गोळा करू.”

“आपण लोकांना निमंत्रण पाठवू,” फ्रीडाने सुचवलं.

“आपण येणाऱ्या महत्वाच्या व्यक्तींची यादी करू,” लिलियनने सूचना केली.



“हे खूप चांगले विचार आहेत,” मी म्हणाले, “आणि या दिवशी मी एक भाषण पण देईन.”

“आपण एवढ्या लोकांची बसण्याची व्यवस्था कुठे करणार?” साराने विचारलं.


त्यासाठी काय करावं लागेल हे मला माहित होतं.



दुसऱ्या दिवशी मी पॅकन हॉलला गेले. तो एकमात्र हॉल होता जो आमच्या कार्यक्रमासाठी योग्य होता.

"तुला काय हवं आहे?” फॅन्सी बिजनेस सूट घातलेल्या माणसानं मला विचारलं.

“मी इथल्या मालकाला भेटायला आले आहे. मला एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी हा हॉल पाहिजे,”.



“तू हॉलच्या मालकाशीच बोलत आहे.”

“मी गोल्डी माबोहेज़ आहे आणि मी अमेरिकन यंग सिस्टर्स सोसायटीची अध्यक्ष आहे." मग मी माझ्या येण्याचं कारण सांगितलं.

शेवटी त्यांनी आपली मान हलवत मोफत हॉल वापरण्याची परवानगी आम्हांला दिली.

आम्ही मोठ्या कागदावर निमंत्रण लिहले आणि पोस्टर पेंट केले.

आता माझे भाषण राहिलं होतं. असं प्रथमच झालं होतं की काय करावं हे मला समजत नव्हतं.






“तू भाषण लिही.” आई म्हणाली. “म्हणजे तू काही विसरणार नाहीस.”

रात्रभर मी संघर्ष केला, पण शब्दच सुचले नाही. आता ऐनवेळी मला आपल्या ह्रदयापासून बोलावं लागणार होतं.

अमेरिकन यंग सिस्टर्स सोसाइटी



कार्यक्रमाच्या रात्री मी पॅकन हॉलच्या पडद्याआडून डोकावलं.

आई आणि बाबा पुढच्या ओळीत बसले होते. यंग सिस्टर्स आणि त्यांचे आईवडील मागे बसले होते. पण बाकी लोक कुठे होते - ते लोक ज्यांच्याजवळ पैसे होते?

माझ्या पोटात आणि गळ्यात एक गोळा आला. कारण मी अध्यक्ष होते, म्हणून मी एक दीर्घ श्वास घेतला, मंचावर पाऊल ठेवलं, आणि बोलायला सुरुवात केली.


"कल्पना करा की पाठ्यपुस्तकाशिवाय तुम्हांला वर्गात बसण्याची वेळ आली तर कसे वाटेल. तेव्हा तुम्हांला शिक्षकाचे म्हणणं समजणार नाही. तुम्ही तुमचे काम करू शकणार नाही. आणि शिक्षण, आपल्यासाठी गरिबीतून बाहेर पडण्याचा एकमात्र उपाय आहे."

मी तेव्हा थोड्यावेळ थांबले जेव्हा मी शाळेचे मुख्याध्यापक हॉलमध्ये येतांना आणि एका खुर्चीवर बसतांना पाहिले. त्यांच्याबरोबर शाळेचे सुपरिन्टेन्डेन्ट पण होते. मग माझ्या शाळेचे काही शिक्षक दिसले आणि त्यांच्याबरोबर मुलांचे आईवडील सुद्धा होते. त्यानंतर मिसेज़ प्लॉटकिन आणि मिस्टर मार्गोलिस आले. सगळ्यात शेवटी मिसेज़ गारफिंकेल पण आल्या.

लोक येत राहिले. हळूहळू डझनांनी लोक आले.

“आम्ही या समस्येकडे अशा प्रकारे बघतो,” मी पुढे चालू ठेवलं. आता माझा आवाज अधिक मजबूत होत होता, "मिल्वौकीची मुलं शाळेची पुस्तकं खरेदी करू शकत नाही, त्यांना मदत करण्याची जबाबदारी पूर्ण समाजाची आहे. मी अपील करते की तुम्ही तुमच्या मनात आणि पाकिटात डोकवा आणि तुम्ही जे देवू शकतात ते दान द्या. दें."

जेव्हा माझं भाषण समाप्त झालं, तेव्हा सगळे लोक उठून उभे राहिले आणि जोरजोरात टाळ्या वाजवू लागले.



रेजिना आणि बाकी यंग सिस्टर्स आपापले दानपात्र घेवून लोकांकडे घेवून गेले. पुरुषांनी आपली पाकिटं काढली, महिलांनी पर्सेस उघडल्या, आणि मिसेज गारफिंकेलने पण एकदोन नाणी दिली.

“आपण पुष्कळ पैसे गोळा केले,” मी घरी जात म्हटलं.



आई हसली. “मला वाटतं की आता मुस्कुराईं. " अमेरिकन यंग सिस्टर्स सोसायटी यापुढे कोणतेही आयोजन करणार नाही.” पण खरं तर हे होतं की मी एका नव्या संघटनाबद्दल विचार करत होते. आणि स्थलांतरितांना इंग्रजी शिकवण्यासाठी पैसे गोळा करण्याचा विचार करत होते. मला माहीत होतं की त्यासाठी मला काय करावं लागणार आहे आणि साहजिकच मी त्या संघटनेची राष्ट्रपती होईल.



6 वर्ष की गोल्डा मियर.

गोल्डा मियर इसराएल की प्रधानमंत्री के रूप में.

गोल्डी माबोवेज़ (जिला माबोविच पण म्हटले जाते.) चा जन्म १८९८ मध्ये कीव (रूस) मध्ये झाला होता. १९०६ मध्ये तिचा परिवार मिल्वौकी, अमेरिका मध्ये आला. तिने शिक्षिकेचे प्रशिक्षण घेतले. १९२१ मध्ये त्या पती मॉरिस मेयर्सन बरोबर एक यहूदी मातृभूमी स्थापित करण्यास मदत म्हणून फिलिस्तीन गेल्या. तिथं त्यांनी आपल्यासाठी एक नवीन नाव निवडले, "मियर" जो हिब्रू शब्द होता त्याचा अर्थ “प्रकाश” असा होता. १९६९ -१९७४ पर्यंत इस्त्राईलच्या प्रधान मंत्री म्हणून त्यांनी अनेक महत्वपूर्ण मुद्दांवर आपली मतं व्यक्ती केली. आणि त्यांनी संयुक्त राष्ट्र किंवा इस्त्राईल संसदेत धोरणांविषयी भाषण देण्याशिवाय इतर ठिकाणी बोलतांना त्यांनी कधी आपले भाषण लिहले नाही. १९७८ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या सन्मान म्हणून मिल्वौकी मध्ये फोर्थ स्ट्रीट शाळेचे नाव बदलून गोल्डा मियर स्कूल दिले.

या पुस्तकातील संवाद काल्पनिक आहे. पण घटना सत्य आहेत. अमेरिकन यंग सिस्टर्स सोसायटीने गरीब मुलांसाठी पुस्तकं गोळा करण्याचा प्रयत्न केले. मिल्वौकी जर्नलने त्यांच्या बाबत लिहले.